---जाहिर निविदा----

जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती,

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,

जिल्हाधिकारी कार्यालयाची ईमारत,२ रा माळा,आमगांव रोड,गोंदिया-४४१६०१

दुरध्वनी क्र.-०७१८२-२३११५०

ई.मेल:-asstdiremp.gondia@ese.maharashtra.gov.in

निविदा सुचना क्रमांक :१/२०१४-१५

**व्यवसाय प्रशिक्षण संस्था निवड**

**कौशल्यवृध्दी प्रशिक्षणाव्दारे वेतनी रोजगार करीता अभिव्यक्ती स्वारस्य प्रस्ताव मागणी**

**(Expression of Interest)**

गोंदिया जिल्हयातील दुर्गम,ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्रवर्गातील आदिवासी, गरीब, अल्पशिक्षीत युवकांना व युवतींना मा. प्रंतप्रधान यांच्या महत्वाकांक्षी कौशल्य विकास योजनेच्या अनुषंगाने कौशल्य निर्माण करण्यासाठी व्यवसायनिहाय तांत्रिक कुशलता वाढीसाठी व प्रशिक्षणाव्दारे वेतनी रोजगार उपलब्ध करुन प्रशिक्षण देण्यासाठी नोंदणीकृत, पंजीकृत, सक्षम व अनुभवी स्वयंसेवी/शैक्षणिक/खाजगी व्यवसायीक प्रशिक्षण देणा-या संस्थेची निवड करावयाची आहे. त्याकरिता जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती गोंदियामार्फत इच्छुक संस्थांकडुन खालील प्रशिक्षणाकरीता मोहरबंद पध्दतीने निविदा प्रस्ताव मागविण्यांत येत आहेत.

खालील नमूद केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणा-या प्रशिक्षण संस्थांनी त्यांचे प्रस्ताव दिनाक २०/१२/२०१४ ला दुपारी ५.०० वाजेपर्यंत सदस्य सचिव तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, गोंदिया यांचे कार्यालयात सादर करावे.

| अ.क्र. | क्षेत्र | प्रशिक्षणाचे नांव |
|---|---|---|
| १. | हॉस्पीटॅलिटी | फुड ॲण्ड बेव्हरेज |
| | | हाऊस किपींग |
| २. | बांधकाम | मेसनरी |
| | | बार बेंडींग |
| | | फॉर्म वर्क किंवा कारपेन्टरी |
| ३. | ऑटोमोबाईल | वाहन दुरुस्ती (४चाकी वाहन) |
| ४. | प्लॅस्टीक प्रोसेसींग | प्लॅस्टीक मोल्ड असिस्टंट, |

**अटी व शर्ती** :-(अटी व शर्तीच्या पृष्ठर्थ निविदा अर्जासोबत कागदपत्रे सादर करावीत.)

१. इच्छुक संस्थांनी त्यांचे तांत्रिक व आर्थीक बाबींचा कोर्सनिहाय प्रती विद्यार्थी न्युनतम दरमहा दर प्रस्ताव वेगवेगळया मोहरबंद लिफाप्यामध्ये सादर करावा.

२. संस्थेस मा.जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयात तथा जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीसमोर त्यांच्या तांत्रिक प्रस्तावाचे सादरीकरण करण्यास्तव उपस्थित राहावे लागेल. उपस्थित राहून सादरीकरण न केल्यास, संबधित संस्थेचे प्रस्ताव आपोआपच रद्द होतील. निविदा अटी व शर्ती नुसार संस्थेचे तांत्रिक प्रस्ताव समिती मान्य करील फक्त त्यांचेच आर्थीक बाबींचे सिलबंद लिफाफे उघडण्यात येईल. सादरीकरणाचा दिनाक,स्थळ, वेळ ईमेलव्दारे कळविण्यांत येईल. सर्पकांसाठी ईमेल देणे आवश्यक आहे.

३. संबधीत संस्थेला प्रशिक्षण देण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. संस्थेस सदर अनुभव सरकारी यंत्रणेतील असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

४. संबधित संस्थेकडे चांगल्या दर्जाचे ग्रंथालय, निवास,भोजन व्यवस्था व प्रशिक्षण देण्यासाठी सोईयुक्त ईमारत व ईतर सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

....2..

५. संस्थेला निवासी स्वरुपाचे प्रशिक्षण द्यावे लागेल व त्या दरम्यान प्रशिक्षणार्थाच्या निवास, भोजन,चहा,नास्ता ई. अनुषंगीक व्यवस्था संस्थेला करावी लागेल.
६. कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या मान्यतेने प्रशिक्षणार्थ्याचा शोध घेणे, समुपदेशन करणे, ~~निवड करणे,~~ प्रशिक्षण देणे, रोजगार उपलब्ध करुन देणे, योजनेचा प्रचार प्रसार करणे ई. सर्व जावबदारी निवड झालेल्या संस्थेची राहील.
७. प्रशिक्षणार्थी गोंदिया जिल्हयाचा रहिवासी असावा व त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नोंदविलेले असणे आवश्यक आहे.
८. प्रशिक्षणाचा कालावधी प्रशिक्षणाच्या ट्रेडनुसार किमान १ महिना ते ६ महिणे इतका आवश्यकतेनुसार राहील.
९. प्रशिक्षणानंतर किमान ३ महिने रोजगार पुरविणे बंधनकारक आहे.
१०. प्रशिक्षणानंतर संस्थेने पुरविलेल्या रोजगाराव्दारे प्रशिक्षणार्थीस किमान वेतन कायद्याप्रमाणे दरमहा व त्यापेक्षा जास्त वेतन मिळणे अपेक्षीत आहे. त्यापेक्षा कमी वेतन असल्यास कायद्याचा भंग होवू शकतो. अश्या प्रकारात दोषी आढळणा-या संस्था कायदेशिर कारवाईस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.
११. संस्थेकडे पात्रताधारक,तज्ञ व अनुभवी प्रशिक्षक वर्ग (रिसोर्स परसन) असावा.
१२. संस्थेकडे प्रशिक्षणाचा नियोजीत व्यवसायीक अभ्यासक्रम केंद्रशासन/ राज्यशासन/ व्ही.टी.पी./ तांत्रिक शिक्षण मंडळ/ व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण मंडळ/परिक्षा मंडळ मान्यताप्राप्त असला पाहिजे आणि निरनिराळया तांत्रिक व औद्योगिक कंपन्याच्या सहभागातून वेळोवेळी अद्यावत केला असला पाहिजे. व त्यानुसार प्रशिक्षणार्थांना व्यवसायीक प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
१३. उमेदवार निवडीचा खर्च,प्रशिक्षणाचा एकूण खर्च/फी बाबतचा सविस्तर तपशिल सोबत जोडावा. यामध्ये प्रशिक्षण शुल्क, प्रशिक्षण साहित्य खर्च,परिक्षा शुल्क व आवश्यकतेनुसार भोजन -निवास खर्च, प्रवास खर्च तथा रोजगार उपलब्ध करुन देण्याचा खर्च इत्यादीचा समावेश राहील. प्रशिक्षण शुल्कामध्ये सेवाकराचा समावेश करावा.
१४. संबधित संस्थेची मागिल ३ वर्षातील उलाढाल ही प्रतीवर्ष किमान रुपये ५०.०० लाखाचे वर असल्याबाबत अंकेक्षण अहवाल (ऑडीड रिर्पोट) जोडणे आवश्यक आहे.
१५. प्रशिक्षण केंद्रांमध्ये बॉयोमेट्रीक उपस्थिती असणे आवश्यक आहे.
१६. संस्थेकडे सेंट्रलाईजड प्लेसमेंट ट्रॅकींग व ऑनलाईन मॅानिटरींग मेकॅनिजमची व्यवस्था असणा-या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.
१७. निवड झालेल्या संस्थेला करारनामा करतांना रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) चा सदस्य सचिव, जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती, गोंदिया या नावाचा डिमांड ड्रॉफ्ट अनामत म्हणून जमा करावा लागेल. तसेच रुपये २ लाख(अक्षरी दोन लाख फक्त) बँक गॅरंटी स्वरुपात सादर करणे बंधनकारक राहील. सदरची अनामत रक्कम करारनाम्याप्रमाणे कामे न केल्यास जप्त करुन शासन जमा करण्यांत येईल.
१८. संस्थेने त्यांचेकडे असलेला मागील ५ वर्षाचा प्रशिक्षण देण्याचा अनुभव, प्रशिक्षणाचे विषय,आतापर्यत प्रशिक्षण दिलेल्या युवकांची संख्या तसेच प्रशिक्षण कालावधी ईत्यादी बाबत सविस्तर तपशिलसह माहिती देणे बंधनकारक राहील. जेणेकरुन यापूर्वी प्रशिक्षण घेतलेल्या युवकांची पडताडणी करण्यांत येईल.

१९. जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीकडून प्रशिक्षणादरम्यान संस्थाना द्यावयाचे मानधन पुढीलप्रमाणे टप्पाटप्पाने देण्यांत येईल. (गळती झालेल्या प्रशिक्षणार्थ्याचे मानधन देय असणार नाही)

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थीची निवड होवून ५० टक्के प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर | ४० टक्के |

| | | |
|---|---|---|
| २. | जे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करतील त्याच प्रशिक्षणार्थ्यांचे देयक अदा करण्यांत येईल | २०टक्के |
| ३. | प्रशिक्षणार्थींना वेतनी रोजगारी/नोकरी उपलब्ध करुन दिल्यानंतर (कमीतकमी उमेदवार वेतनी रोजगाराच्या निम्मे दिवस उपस्थित असणे बंधनकारक आहे.) | २५टक्के |
| ४. | किमान ७० टक्के प्रशिक्षणार्थींना वेतनी रोजगार/नोकरी उपलब्ध करुन दिल्यानंतर (कमीतकमी उमेदवार ९० दिवस Tie-up झालेल्या कंपनीत वेतनी रोजगारावर असणे बंधनकारक आहे.) | १५ टक्के |

२०. प्रशिक्षणादरम्यान जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती व त्यांनी प्राधीकृत केलेले अधिकारी वारवांर प्रशिक्षणास भेट देवून प्रशिक्षणाच्या दर्जाबाबत तपासणी करतील, तसेच प्रशिक्षणानंतर देखील प्रशिक्षणार्थींना पुरविलेल्या रोजगारांची खातजमा करण्यांत येईल.

२१. संस्थाना स्वत:च्या अटी व शर्ती टाकता येणार नाहीत.

२२. निविदेमधील अटी व शर्ती पूर्ण केलेल्या व प्रशिक्षण शुल्क न्युनतम आकारलेल्या प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यांत येईल.

२३. निविदा फॉर्म दिंनाक ०६/१२/२०१४ ते दिंनाक १९/१२/२०१४ रोजी दुपारी ०१ वाजेपर्यंत सदस्य सचिव तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाची ईमारत, दुसरा माळा, रुम न.२१०, आमगांव रोड, गोंदिया-४४१६०१ यांचे कार्यालयात(सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन कामाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत) रुपये ५००/- शुल्क भरुन प्राप्त करता येईल.

२४. संपूर्ण तपशिल भरलेल्या सिलबंद निविदा दिंनाक ०६/१२/२०१४ ते दिंनाक २०/१२/२०१४ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंतच सदस्य सचिव तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाची ईमारत, दुसरा माळा, रुम न.२१०, आमगांव रोड, गोंदिया-४४१६०१ या ठिकाणी स्विकारल्या जातील.

२५. निवड झालेल्या संस्थेस योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी निर्गमित झालेल्या अथवा होणा-या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा करुन द्यावा लागेल.

२६. तांत्रिक व आर्थीक बाबीमध्ये वाटाघाटीचे संपूर्ण अधिकार जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीला राहील.

२७. याबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास तो गोंदिया न्यायालयाच्या कक्षेतच राहील. निवीदा भरणा-या संस्थेने वरील नमूद प्रशिक्षणासाठी निविदा सादर केली असल्यास व सदर कोर्सला प्रतिस्पर्धी निवीदा प्राप्त न झाल्यास त्या संस्थेसोबत पुढील वाटाघाटी करण्यांचा अधिकार समितीला राहील.

२८. निरनिराळया प्रशिक्षणात ट्रेडबाबत निरनिराळया संस्थेच्या कार्यक्षमतेनुसार निर्णय घेंण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना असेल.

२९. संस्थेकडे निवीदेतील नमूद प्रशिक्षणाव्यतीरिक्त त्यांचेकडे ईतर रोजगार क्षम व्यवसाय ट्रेड असल्यास तसे नमूद करावे.

३०. अटी व शर्तीमध्ये बदल करणे, कोणत्याही संस्थेचे प्रस्ताव मागविणे, स्विकारणे, निलंबित करणे, रद्य करणे, चर्चा व बोलणी करणे, दर ठरविणे व बदल करुन अन्य संस्थांना देणे याबाबत निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती, गोंदिया यांना राहतील.

अध्यक्ष
जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती,गोंदिया
तथा जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

सदस्य सचिव,
जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती,गोंदिया
तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,गोंदिया